# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

MAHARASHTRA

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

"Your Service is our Duty"


No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 240828-FTS-0031

Date: 28/ 08 / 2024

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed** 4 sand ghats in Sangli District (i.e. Shivni in Kadegaon Taluka, Anjani-Sawalj in Tasgaon Taluka, Vithalapur Satha-1 in Atpadi Taluka & Vithalapur Satha-2 in Aatpadi Taluka). **Proposed by** The District Mining Officer, Collector Office, Sangli 416415, Maharashtra.

**Ref:** Sub-Regional Sangli submitted proceeding vide dt-08.08.2024, received on 12.08.2024.

**Sir,**

The Public Hearing for **Proposed 4 sand ghats in Sangli District (i.e. Shivni in Kadegaon Taluka, Anjani-Sawalj in Tasgaon Taluka, Vithalapur Satha-1 in Atpadi Taluka & Vithalapur Satha-2 in Aatpadi Taluka). Proposed by The District Mining Officer, Collector Office, Sangli 416415, Maharashtra.**

Environmental public hearing Conducted on dtd. 08.05.2024 (Wednesday), Time-11.00 A,M. at Meeting Hall Collector Office, Sangli, Tal-Miraj, District-Sangli, Maharashtra. The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

**(Dr. Avinash Dhakne IAS),**
**Member Secretary**

**Encl: As above**
**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, MPCB, Kolhapur.
2) The Sub Regional Office, MPCB, Sangli
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**
The District Mining Officer, Collector Office, Sangli 416415, Maharashtra

Annexure-VI

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडून वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीव्दारे विक्री याबाबतचे सर्वकष धोरण २०२३ नुसार सांगली जिल्हयातील प्रस्तावित ४ रेती घाटांसाठी ( शिवणी, अंजनी-सावळज, विठलापूर साठा-१, विठलापूर साठा-२ ) दिनांक ०८-०५-२०२४ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बाबतचे इतिवृतांत.**

---

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडून वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीव्दारे विक्री याबाबतचे सर्वकष धोरण २०२३ नुसार सांगली जिल्हयातील प्रस्तावित ४ रेती घाटांसाठी ( शिवणी, अंजनी-सावळज, विठलापूर साठा-१, विठलापूर साठा-२ ) प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दिनांक ०८-०५-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथील जिल्हा नियोजन समिती सभागृह सांगली येथे घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र. ई १३६ दि. २५/०४/२०२४, पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०४२५-एफटीएस-०२००, दिनांक २५-०४-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली त्यानुसार सुनावणीस खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. श्रीमती. ज्योती पाटील,
निवासी उप जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी. - **अध्यक्ष**
प्रतिनिधी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली.

२) मा. श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर.

३) मा. श्री. नवनाथ सं. अवताडे, - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

श्री. नवनाथ एस.अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष मा. श्रीमती. ज्योती पाटील, निवासी उप जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली,

सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती मा. श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, तसेच उपस्थित असलेल्या नागरीकांचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडून वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणातीव्दारे विक्री याबाबतचे सर्वकष धोरण २०२३ नुसार सांगली जिल्हयातील प्रस्तावित ४ रेती घाटांसाठी ( शिवणी, अंजनी-सावळज, विठलापूर साठा-१, विठलापूर साठा-२ ) पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार पर्यावरण, वने, व हवामान बदल, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार सदरहू प्रकल्पास आगाऊ "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याने सदर सुनावणीचे आयोजन करण्यांत आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणामाविषयी माहिती देणे व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे हे आहे.

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी सदरची जनसुनावणी बुधवार दिनांक ०८ मे, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना २००६ व सुधारित अधिसूचना २००९ अनुसार त्यांच्याकडील दिनांक

२५-०४-२०२४ च्या आदेशानुसार पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती गठित केली आहे.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची पर्यावरण व आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ व सुधारित अधिसूचना २००९ अन्वये उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक "दैनिक सकाळ" मध्ये मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र "टाईम्स ऑफ इंडिया" मध्ये इंग्रजी भाषेमध्ये जनसुनावणी बाबत जाहीर सूचना दिनांक ०९-०४-२०२४ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचे सर्व दस्तऐवज लोकांच्या माहिती व अभ्यासाकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.
२. जिल्हा उदयोग केंद्र, उदयोगभवन, सांगली.
३. जिल्हा परिषद, सांगली.
४. झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यू सेक्रेटरीएट बिल्डींग,तळमजला इस्ट विंग,सिव्हील लाईन नागपूर-४४०००१.
५. उप सचिव,पर्यावरण विभाग,नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,मादाम कामा मार्ग,मंत्रालय,
मुंबई - ३२.
६. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, उदयोग भवन, कोल्हापूर.
८. तहसिल कार्यालय, तासगांव, आटपाडी, आणि कडेगांव, जि.सांगली.
९. ग्रामपंचायत कार्यालय, अंजनी-सावळज, तालुका तासगांव, जिल्हा सांगली.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, विठलापूर, तालुका आटपाडी, जिल्हा सांगली.
११. ग्रामपंचायत कार्यालय, शिवणी, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली.

तसेच म. प्र. नि. मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली होती.

आयोजक, यांनी आजतागायत सदरील प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांचेकडे कोणत्याही लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेले नसल्याचे सांगितले. तथापि आज रोजी उपस्थित नागरीक आपले

आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे आयोजक यांनी सांगितले.

आयोजक, यांनी सांगीतले की, उपस्थितांनी केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू सुनावणीचे व्हिडिओ रेकॉर्डीग, चित्रफीत, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मूल्यांकन अहवाल पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेमार्फत केंद्र शासनास सादर करण्यांत येईल.

त्यानंतर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाच्या जल, हवा, घातक कचरा, बिगर घातक कचरा इत्यादी बाबतच्या प्रदुषण विषयक व्यवस्थापन व नियंत्रण तसेच प्रकल्पाच्या स्थानिक पर्यावरण बाबींच्या अनुषंगाने सादरीकरण करण्याची विनंती करण्यात आली.

तदनंतर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सादरीकरणामध्ये प्रस्तावीत सांगली जिल्हयातील ४ रेती घाटांची माहिती दिली. — १) शिवणी तालुका कडेगांव, नांदणी नदी गट क्रं. ४५२, ४५३, ४५४, ४५५, ४५६, क्षेत्र- १.०५ हेक्टर. २) अंजनी-सावळज, तालुका तासगांव, अग्रणी नदी गट क्रं. ६०२, १५७, १५८, १५९, १६० व १६१, क्षेत्र- १.२४ हेक्टर. ३) विठठलापूर-१, तालुका आटपाडी, माण नदी, गट क्रं. ३१४, क्षेत्र-१.०१ हेक्टर, ४) विठठलापूर-२, तालुका आटपाडी, माण नदी, गट क्रं. ८९७, ८९८, क्षेत्र-०.४ हेक्टर उपरोक्त घाटांचे वितरण, विस्तृत यादी, खानकाम पध्दती, रेतीघाट तपशील, पर्यावरणीय व्यवस्थापन योजना, वृक्षारोपण अहवाल व इतर अनुषंगीक बाबींचे सादरीकरण केले.

सादरीकरणानंतर आयोजक, यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी कांही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले, तसेच विचारण्यांत येणारे प्रश्न, शंका व सूचना या पर्यावरण विषयक बाबींशी निगडीत असाव्यात तसेच प्रश्न विचारण्यापूर्वी आपले नांव व गांव आवर्जून सांगण्याची विनंती केली, याची सदरील सुनावणीच्या इतिवृत्तांमध्ये आहे तशी नोंद घेतली जाईल, तसेच उपस्थित प्रश्नांना तांत्रिक सल्लागार स्पष्टीकरण देतील, याबाबतही उपस्थितांना कल्पना देण्यात आली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

१. **श्री. किरण चव्हाण, सांगली.**

प्रश्न - नदीपात्रात वाळूचे उत्खनन कसे होणार?

उत्तर - नदीपात्रातील वाळूचे उत्खनन फावडे आणि पाटयाच्या सहाय्याने करण्यात येणार आहे.

२. **श्री. अरुण पाटील, मिरज.**

प्रश्न - नदीपात्रातील वाळू ट्रॅक्टरने की डंपरने ओढायची? तसेच ब्लास्टिंग चालणार का ?

उत्तर - नदीपात्रातील वाळू ट्रॅक्टर ट्रॉलीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात येणार आहे आणि तेथून

पुढील वाहतूक डंपरद्वारे केली जाईल. नदीपात्रात ब्लास्टिंग केले जाणार नाही.

३. **श्री. शंकर धोंडीराम खोत, सांगली.**

प्रश्न – प्रदुषण होणार का ?

उत्तर - यामुळे कोणतेही प्रदूषण होणार नाही.

४. **श्री. राजाराम कांबळे, सांगली.**

प्रश्न – वायु प्रदुषण होणार का ?

उत्तर - वाळू उत्खनन करताना कोणतीही यंत्रसामुग्री वापरली जाणार नाही, त्यामुळे वायू प्रदूषण

होणार नाही. रस्त्यावर स्प्रिंकरलच्या सहाय्याने पाणी फवारले जाईल.

५. **श्री. अरुण पाटील, मिरज.**

प्रश्न – लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही तर अशा परिस्थितीत स्प्रिंकलरसाठी कसे पाणी उपलब्ध होईल.

उत्तर – ही वस्तुस्थिती लक्षात घेतली आहे आणि त्यानुसार योग्य ते नियोजन केले जाईल.

६. **श्री. बी. के. वाघमोडे,**

प्रश्न – याभागामध्ये द्राक्ष पिके असल्यामुळे धूळ थांबविण्यासाठी पाणी मारणे आवश्यक आहे

उत्तर - वायू प्रदुषण कमी करण्यासाठी रस्त्यावर पाणी शिंपडले जाणार आहे त्यामुळे बागेला असा काही धोका निर्माण होणार नाही.

७. **श्री. अरुण पाटील, मिरज.**

प्रश्न – द्राक्षावर धूळ बसल्यावर काडी सुटणार नाही त्यामुळे पिक येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा



M.P.C. Board, Regional Office, Sangli

मोठा तोटा आहे त्यामुळे द्राक्षांचे मोठे नुकसान होणार आहे.

उत्तर —आवश्यकतेनुसार पाण्याची उपलब्धता करुन उपाय योजना केली जाईल.

उपस्थितांकडून अधिक प्रश्न नसल्याने, संयोजकांनी समितीचे सदस्य श्री जगन्नाथ साळुंखे यांना आपले मत मांडण्याची विनंती केली.

श्री जगन्नाथ साळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी उपस्थितांना संबोधित करताना वायू प्रदूषण कमी करण्यासाठी वाळू उत्खनन करणाऱ्या ठेकेदारांनी रस्त्यावर सतत पाणी शिंपडण्याची काळजी घ्यावी असे सांगीतले.

रेती उत्खनन करताना नदीचा नैसर्गिक प्रवाह कायम राहील याची काळजी घ्यावी. नदीचा प्रवाह बदलल्यास जलचरांवर वाईट परिणाम होतो. वनस्पती आणि जीवजंतू यांचे रक्षण केले पाहिजे. पर्यावरणाच्या रक्षणाची काळजी प्रत्येकाने घेतली पाहीजे, हा या सुनावणीचा उद्देश आहे. रस्त्यावर खड्डे पडू नयेत याची काळजी घेतली पाहीजे. वाळू उत्खननाला परवानगी देताना या सर्व बाबींवर लक्ष ठेवले जाणार आहे.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार यांनी पर्यावरण संबंधीत व जलचराचे रक्षण करण्याच्या दृष्टीने रेती घाटाच्या खोलीचा विचार केला असल्याचे सांगितले.

श्री. ए. पी. देवेकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी, सांगली, यांनी सांगितले की रेती घाटातून डेपोपर्यंत रेतीची वाहतूक ही ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे केली जाईल आणि डेपोतून पुढील वाहतूक ही डंपरद्वारे केली जाईल.

शेवटी श्रीमती. ज्योती पाटील, अध्यक्ष, पर्यावरण जनसुनावणी तथा निवासी उपजिल्हाधिकारी आणि अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांनी थोडक्यात संबोधित करताना सांगीतले की, शिवनी, अंजनी, सावळज आणि विठ्ठलापूर 1 आणि विठ्ठलापूर 2 या चार रेती घाटांबाबत येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात आली आहे. लोकांनी येथे काही प्रश्न विचारले आहेत. त्यांचे मुद्दे अगदी बरोबर होते. या सर्व मुद्यांना प्रकल्प सल्लागारांनी योग्य ती उत्तरे आणि स्पष्टीकरण दिलेले आहे. समितीचे सदस्य श्री.जगन्नाथ साळुंखे यांनी येथे जलचरांच्या जगण्याचे महत्व सांगितले आहे. पर्यावरण परवानगी मिळाल्यानंतरच उत्खनन सुरू केले जाईल. सर्व नियमांच्या चौकटीतच वाळू उत्खनन केले



Sub Regional Office M.P.C. Board, Sangli

जाईल, पर्यावरणाच्या संरक्षणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे, जलचरांचे संरक्षण करताना पर्यावरण संतुलन राखले जाईल. सुनावणीला उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

शेवटी आयोजक, पर्यावरण जनसुनावणी यांनी सर्व उपस्थित नागरीक, प्रकल्प अधिकारी, शासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने सदरील जन सुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

सदर सुनावणीची कार्यवाही सकाळी ११.०० वाजता सुरू होऊन दुपारी १.३० वाजता समाप्त झाली.

**( नवनाथ सं. अवताडे )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

**( जगन्नाथ शं. साळुंखे )**
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

**( श्रीमती. ज्योती पाटील )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती-
निवासी उप जिल्हाधिकारी
तथा अपर जिल्हा दंडाधिकारी , सांगली.



Sub Regional Office M.P.C. Board, Sangli